
सईशा प्रॉडक्शन्स मुंबई निर्मित व प्रस्तुत
संगीत
शिवस्वराज्यगाथा
४३ नवगीतांमधून साकारलेलं संगीतमय शिवचरित्र
लेखन, गीत, संगीतः श्री. अनिल नलावडे • दिग्दर्शन, निवेदनः पद्मश्री राव
गायकः नचिकेत देसाई, श्रीरंग भावे, केतकी भावे जोशी, अनिल नलावडे

# कार्यक्रमाबद्दल

छत्रपती शिवाजी महाराजांचं चरित्र घराघरांत आणि मनामनांत पोहोचावं यासाठीच सईशा प्रोडक्शन्स मुंबई गेल्या १५ वर्षांपासून प्रयत्नशील आहे. श्री. अनिल नलावडे लिखित व रचित, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'संगीत शिवस्वराज्यगाथा' या उपक्रमामध्ये, ४३ नवगीतांमधून तसेच काव्य, ओजस्वी निवेदन आणि दृक्श्राव्य माध्यमातून शिवछत्रपतींचा जीवनपट साकार केला जातो. यात सादर होणारी सर्वच गीते आणि स्फूर्तिदायी काव्ये ही संपूर्णतः नवीन, स्वरचित व स्वसंगीतबद्ध आहेत. फक्त मराठ्यांच्या लढायाच नाही तर महाराजांची अर्थनीती, राजनीती, दुर्गनीती, व्यवस्थापन आणि अखंड भारताचे स्वप्नं अशा विषयांवर या नवगीतांची निर्मिती करण्यात आलेली आहे. शिवकाळातील परिचित - अपरिचित योद्धे आणि घडलेले अनेक प्रेरणादायी प्रसंग हे सारेच संगीताच्या माध्यमातून आणि अभ्यासपूर्ण विवेचनातुन दृक्श्राव्य पद्धतीने रंगमंचावर सादर होते. तसेच याचे निवेदन मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांमधून केले जाते.





**देवेंद्र फडणवीस**
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२


२४ नोव्हेंबर २०१७

## शुभेच्छा

मुंबईतील सईशा फाउंडेशनतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील शिवरूद्राचे दिग्विजयी तांडव या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे, ही समाधानाची बाब आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे समस्त भारतीयांच्या मनात राष्ट्रवादाचे चैतन्य निर्माण करणारे महान ऊर्जास्त्रोत आहेत. महाराजांचे स्वराज्य हे लोककल्याणकारी राज्याचे एक परिपूर्ण उदाहरण आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवूनच राज्य शासनाचा कारभार सुरू आहे. अशा लोकोत्तर राजाच्या जीवनकार्यावरील संगीतमय कार्यक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरेल. या कार्यक्रमाचे निवेदन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे करीत आहेत हा दुग्धशर्करा योग आहे. या शिवआख्यानाच्या माध्यमातून जनजागृतीचा जागर घातला जाईल, असा विश्वास वाटतो.

सईशा फाउंडेशनच्या सर्व उपक्रमांना मनःपूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)


दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, फॅक्स : ०२२-२२०२ ९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in


---


महापौर, मुंबई

**सुनिल प्रभु**
महानगरपालिका सभागृह,
महानगरपालिका मार्ग, सी. एस. टी., मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी कार्यालय : २२६२ ०४७० / २२६२ १०२०
फॅक्स क्रमांक : २२६१ ६७६१


क्र. एम. एस./ ५६५८/एम. जी.
दिनांक : २३ डिसेंबर २०१३.

प्रति,
कु. पद्मश्री राव,
संचालक,
सईशा फाऊंडेशन.

महोदया,

दि. २५ ऑक्टोबर २०१३ रोजी सईशा फाऊंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेला 'शिवरुद्राचे दिग्विजयी तांडव' हा शिवचरित्रावरील संगीतमय कार्यक्रम आपल्या निमंत्रणामुळे 'हयाची डोळा' पाहण्याची संधी मला मिळाली.

हया कार्यक्रमास केवळ उत्कृष्ट म्हणणे योग्य ठरणार नाही, तर, सर्वोत्कृष्ट दर्जेदार आणि देशप्रेमाची भावना जागविणारा एक अभिनव उपक्रम म्हणता येईल. नवोदित कवी श्री. अनिल नलावडे हयांच्या प्रतिभेतून साकारलेला शिव इतिहास, प्रेक्षकांसमोर साकार करण्यासाठी कु. पद्मश्री राव व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले परिश्रम हयांचा सुरेख संगम २२ नव गीतांच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर ज्या पद्धतीने साकार करण्यात आला ते पाहता राष्ट्र भावना जागृतीसाठी हा यज्ञकुंड धगधगत रहावा असे मनापासून वाटते.

विद्यार्थ्यांकरिता तसेच ज्यांना इतिहासाची अल्प ओळख आहे, त्यांच्यासाठी हा कार्यक्रम मनोरंजनातून समाज प्रबोधन हया रुपात निश्चित मार्गदर्शक ठरेल यात संदेह नाही.

शिवप्रेमाचा हा यज्ञकुंड धगधगत ठेवण्यासाठी सईशा फाऊंडेशनला सहकार्य करावे असे मी हया पत्राद्वारे आवाहन करीत आहे.

आपला स्नेहांकित,

( सुनिल प्रभु )

D:\मेहा\ऐवजाचे\पत्रे 2013\डिसेंबर 2013...doc


**महापौर निवास** : स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८.
दूरध्वनी निवास : २४४४ १२११, २४४५ १०२०






# संगीत शिवस्वराज्यागाथा

चला.. शिवचरित्र स्मरुया, राष्ट्र घडवूया..








# प्रतिक्रिया









# काही निवडक गौरवशाली सादरीकरणे

१) IIM Ahmedabad येथे मॅनेजमेंटच्या २५०० विध्यार्थ्यांसाठी (निवेदन इंग्लिश मध्ये)

२) मराठा लाईट इन्फेन्ट्री रेजिमेंटल सेंटर बेळगाव येथे सलग ३ दिवस 6500 सैनिकांसाठी

३) पद्मविभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी ३ वेळा या कार्यक्रमासाठी स्वतः निवेदन केले

४) शिवसृष्टी, पुणे येथे दिवाळी पहाट विशेष कार्यक्रम

५) महासंस्कृती महोत्सव २०२४ - डोंबिवली, अभ्युदयनगर आणि वांद्रे येथे महाराष्ट्र सरकारतर्फे भव्य कार्यक्रम

६) महाराष्ट्र मंडळ, चेन्नई समस्त मराठी जनांसाठी

७) महाराष्ट्र असोसिएशन चेन्नई येथे १ मे निमित्त विशेष कार्यक्रम

८) राजभवन - चेन्नई येथे माननीय राज्यपालांसमोर विशेष सादरीकरण

९) ग्लोबल कोकण महोत्सव २०२४ - डोंबिवली येथे शिवसंस्कार चित्रकाव्य कलादालनचे आयोजन

१०) रायगड किल्ल्यावर भर दरबारात शिवराज्याभिषेक समितीद्वारे आयोजन

११) कालाघोडा आर्ट फेस्टिव्हल मध्ये 17 वर्षात पहिल्यांदा शिवछत्रपतींवर कार्यक्रम

१२) छत्रपती शिवाजी महाराज पार्क आर्ट फेस्टिवल यांचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यक्रमाने

१३) मुंबई आकाशवाणीच्या अस्मिता मराठी वाहिनीवरून शिवजयंती निमित्त सलग दोन दिवस दोन वर्षे जगभरात प्रसारण

१४) दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर सलग दोन रविवार प्रसारण

१५) मुंबईतील रॉयल ऑपेरा हाऊस येथे 100 वर्षात पहिल्यांदाच छत्रपती शिवाजी महाराजांवर भव्य कार्यक्रम

१६) महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्र वर्धापन दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर आणि वाशी येथे भव्य आयोजन

१७) ओएनजीसी, मुंबई येथे समस्त कर्मचारी, पदाधिकाऱ्यांकरिता शिवजयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम

१८) एचपीसीएल, मुंबई च्या सर्व पदाधिकाऱ्यांसाठी भव्य कार्यक्रम

१९) मराठी एकीकरण समिती, महाराष्ट्र राज्य पुरस्कृत यांच्यातर्फे भव्य आयोजन

२०) जळगांव, जालना, परभणी, नाशिक, अहिल्यानगर येथे भव्य आयोजन

२१) अक्कलकोट स्वामी समर्थ संस्थान तर्फे भव्य आयोजन

२२) एम आय टी विद्यापीठ, पुणे येथील विद्यार्थ्यांसाठी भव्य आयोजन

२३) नूतन विद्यामंदिर - मानखुर्द, आयईएस राजा शिवाजी विद्यालय - दादर, साने गुरुजी विद्यालय - दादर

२४) शारदाश्रम - दादर, के व्ही पेंढारकर कॉलेज-डोंबिवली

२५) भोसला मिलिटरी स्कुल - नाशिक येथे विद्यार्थ्यांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन झाले आहे

२६) परशुरामभाऊ दांडेकर विद्यालय, केळशी येथे कलादालन आणि संगीत शिवस्वराज्यगाथा याचे आयोजन

सईशा प्रॉडक्शन्स मुंबई आयोजित - शिवसंस्कार महोत्सव

# REACH US

@SangeetShivswarajyagatha

sangeetshivswarajyagatha

sangeetshivswarajyagatha

9821554130, 9821556448

saishaproductionsmumbai@gmail.com

B 402, Galaxy Exotica, Chhatrapati Shivaji Maharaj Nagar, Shahajiraje Road, VileParle East, Mumbai - 400057

